वाचले :-
१) शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.२ डिसेंबर १९९७
२) आदेश क्रमांक प्रशा/३/कावि/१५६१/२०१६, दि. १७/१२/२०१६
३) श्रीम.जगदाळे धनश्री महेश, आरोग्य निरीक्षक यांचा दिनांक ०५/०३/२०२४ रोजीचा राजीनामा अर्ज
४) सहाय्यक आयुक्त, ह क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/आ-१-/कावि/२५१/२०२४ दि.१९/०३/२०२४
५) मा. आयुक्त सो यांचेकडील दिनांक ०३ /०४ /२०२४ चा मान्य प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/१/कावि/१५/२०२४
दिनांक ०३ /०४ /२०२४

**विषय :- श्रीम. जगदाळे धनश्री महेश, आरोग्य निरीक्षक यांचा महापालिका सेवेचा राजीनामा मंजूरीबाबत... (स.क्र. ११३५५)**

आदेश,

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर उपरोक्त वाचले क्र. २ चे आदेशान्वये श्रीम. जगदाळे धनश्री महेश यांची 'आरोग्य निरीक्षक' या पदावर र.रु. ९३००-३४८०० ग्रेड पे रु. ४२०० या वेतनश्रेणीमध्ये सरळसेवा प्रवेशाने नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार श्रीम. जगदाळे धनश्री महेश,आरोग्य निरीक्षक ह्या दिनांक २१/१२/२०१६ रोजी महानगरपालिका आस्थापनेवर रुजू झाले आहेत.

श्रीम. जगदाळे धनश्री महेश,आरोग्य निरीक्षक यांनी उपरोक्त वाचले क्र. ०३ चे अर्जान्वये पुणे महानगरपालिकेमध्ये वरीष्ठ आरोग्य निरीक्षक पदावर निवड झाली असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. श्रीम.जगदाळे धनश्री महेश, आरोग्य निरीक्षक यांची दिनांक ०५/०३/२०२४ अखेर महानगरपालिकेमध्ये ०७ वर्षे २ महिने १५ दिवस इतकी सेवा होत आहे.

सहाय्यक आयुक्त, ह क्षेत्रीय कार्यालय यांनी उपरोक्त वाचले क्र. ४ अन्वये श्रीम. जगदाळे धनश्री महेश,आरोग्य निरीक्षक यांचेकडून महानगरपालिकेस नवीन घर कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहन कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज, सोसायटी कर्ज व वैद्यकीय अग्रिम येणे बाकी नसून सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसून त्यांचा राजीनामा मंजूरीबाबत स्पष्टपणे शिफारस केली आहे. नियुक्ती आदेशातील अट क्र. १५ नुसार श्रीम. जगदाळे धनश्री महेश यांनी १ महिन्याची आगाऊ लेखी नोटीस दिलेली आहे.

सबब, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २ डिसेंबर १९९७ मधील तरतुदी, विभागप्रमुखांनी केलेली शिफारस व श्रीम. जगदाळे धनश्री महेश यांनी मनपा सेवेचा राजीनामा देणेकामी केलेला विनंती अर्ज विचारात घेता मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रस्तुतच्या आदेशान्वये, श्रीम. जगदाळे धनश्री महेश यांचा दिनांक ०५/०३/२०२४ ते आदेशाचे तारखेपर्यंतचा कालावधी विनावेतनी करुन 'आरोग्य निरीक्षक' या पदाचा महापालिका सेवेचा राजीनामा आदेशाच्या तारखेपासून मंजूर करण्यास मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे लेखापरिक्षणार्थ अन्य काही येणे रक्कम निघाल्यास ती संबंधित कर्मचा-यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधित कर्मचारी यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,
श्रीम. जगदाळे धनश्री महेश, आरोग्य निरीक्षक
प्रत, १. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३. आरोग्य विभाग
४. दूरसंचार, ५. माहिती व जनसंपर्क ६. कामगार कल्याण विभाग
७. ह क्षेत्रीय कार्यालय, ८. साप्रवि. टेबल क्र. ७,८,१०,११,१२,१४, संगणक कक्ष
०९. सर्व संबंधित विभाग

(विठ्ठल जोशी)
उपआयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,